ePaper

## दाच्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी 'पानिपत'कार, विश्वास पाटील यांची निवड

| वर्ष - 9 | अंक -24 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | सोमवार, दि. 15 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



### आतील पानांत


- श्रीलंकेचा बांगलादेशवर विजय!
- लोकांसाठी असेल हा सामना महत्वाचा
- नोटबंदीनंतर मला रांगेत उभं केलं!
- अवघ्या १५ हजारांसाठी सर्व गमावलं!



## 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' आसमंती भिनला, दाही दिशा घुमला...

# 'शंभुराजे शंभुराजे' जयघोष!

## धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांना गगनभेदी मानवंदना

| पिंपरी-चिंचव |
प्रतिनिधी | महाईन्यूज

**आसमंत उजळून टाकणारे भगवा ध्वज... ढोल-ताशांचा गगनभेदी निनाद...आणि मर्दानी खेळ सादरकरणाऱ्या मावळ्यांची चित्तथरारक प्रात्यक्षिके... आणि त्याला शिवगीत सादरकर्ते अवधुत गांधी यांच्या मावळी सुरांची साथ... शिव-शंभूभक्तांची अफाट गर्दी... आणि साक्षात वरुणराजाचा जलाभिषेक... असा ना भूतो ना भविष्यती अनुभव हजारो शिव-शंभूप्रेमी आणि पिंपरी-चिंचवडकरांनी घेतला. निमित्त होते, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे जगातील सर्वांत उंच शिल्प आणि शंभू सृष्टीला ढोल-ताशांची रोमहर्षक ऐतिहासिक मानवंदनेचे.**




हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ढोल-ताशा महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या पुढाकाराने 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'ला ऐतिहासिक मानवंदना सोहळ्याचे आयोजन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र, मोशी येथे करण्यात आले होते. या निमित्ताने हजारो शिव-शंभू भक्तांनी या ठिकाणी तुफान गर्दी केली. विशेष म्हणजे, पावसाने जोरदार हजेरी लावलेली असतानाही हा सोहळा अक्षरशः 'रेकॉर्ड ब्रेक' ठरला. शिव गीतांचे प्रसिद्ध गायक अवधूत गांधी यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या चरणी मानवंदना सादर केली. यानंतर हिंदू भूषण ट्रस्ट स्मारकाची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. "युगत मांडली...", "शिवरायांच्या बुद्धीयुक्तीचा लागना पारं.." , "शिवबा राजं... शिवबा राजं..." अशा गीतांवर हजारो प्रेक्षक आणि वादकांनी ताल धरला.

ह.भ.प. संग्रामबापू भंडारे यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावत शिवशंभूच्या विचारांना पुढे चालवण्यासाठी "धर्मनिष्ठा, कर्मनिष्ठा" हेच ब्रीद ठेवून काम करणारे आमदार महेश लांडगे आहे असे सांगत "आय लव्ह यु दादा" असे म्हटले. त्याचबरोबर महाराष्ट्रातील तमाम शिवशंभु प्रेमी, पिंपरी-चिंचवड शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. शिववंदना आणि ध्वज प्रणामाने सोहळ्याचा समारोप करण्यात आला. यावेळी 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' च्या आवारात जोरदार आतिषबाजी करण्यात आली.

### शंभू राजांना अभिप्रेतकाम ट्रस्ट करेल...

यावेळी स्मारकाचा उद्देश आयोजकांतर्फे जाहीर करण्यात आला. प्रा. इंद्रजीत भोसले यांनी स्मारकाची उद्दिष्टे यावेळी जाहीर केली ते म्हणाले की, हिंदू भूषण स्मारक ट्रस्ट पिंपरी-चिंचवडची स्थापना सन 1860 संस्था नोंदणी अधिनियमाच्या कलम 20 अन्वये करण्यात आलेली आहे. स्मारकाचा उद्देश तरुण पिढीमध्ये हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराज व धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांचे विचार भावी पिढ्यापर्यंत आणि जगभरात प्रचार प्रसार करण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे विचार स्वातंत्र, पराक्रम धर्मनिष्ठा, ज्ञाननिष्ठा आणि स्वराज्य रक्षणासाठी समर्पित होते त्यांनी आपल्या धर्माचे आणि संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न केले त्यांच्या विचारांना समर्पित असे काम ट्रस्ट येणाऱ्या कालावधीत करेल.

### दाही दिशा शिव-शंभूंसमोर नतमस्तक...

हजारो शिवशंभु प्रेमी, ढोल ताशा वादक यांच्या माध्यमातून गगनभेदी मानवंदना छत्रपती संभाजी महाराज यांच्या चरणी अर्पण करण्यात आली. या ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार होण्यासाठी वरुण राजाने देखील हजेरी लावली. ढोल ताशांच्या गजरातील मानवंदनेने आसमंती एकच गगनभेदी गजर झाला. दाही दिशा 'शिवशंभू'च्या नावापुढे नतमस्तक झाल्या. 3 हजारपेक्षा अधिक ढोल, 1 हजारपेक्षा अधिक ताशा, तसेच 500 ध्वजांच्या गजरात मानवंदना देण्यात आली.

### अचूक नियोजन अन् महाराष्ट्रभरातून पथके...

महाराष्ट्रातील शंभरहून अधिक नामांकित ढोल-ताशा पथके यात सहभागी झाली होती. कार्यक्रमासाठी पार्किंग, भोजन, पिण्याचे पाणी, तसेच वैद्यकीय सेवा अशा आवश्यक सर्व सुविधा सज्ज होत्या. नियोजित आणि चोख नियोजनामध्ये हा कार्यक्रम हजारोंच्या उपस्थितीत पार पडला.या मानवंदनासाठी महाराष्ट्रातून अनेक नावाजलेले ढोल ताशा पथक सहभागी झाले. दरम्यान, पुणे, पिंपरी-चिंचवड लगतच्या अनेक भागातून शिवशंभु प्रेमींनी या मानवंदनेचा ऐतिहासिक सोहळा पाहण्यासाठी हजेरी लावली होती.

### 'लंडन बूक ऑफ रेकॉर्ड" मध्ये नोंद...

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे हे स्मारक जगातील सर्वात उंच म्हणून नोंद झाली आहे. याशिवाय आज देण्यात आलेली मानवंदना यासाठी ढोल ताशा पथकांची उपस्थिती हे देखील नोंद पहिल्यांदाच झाली असून, याबद्दल "लंडन बुक ऑफ रेकॉर्ड" द्वारा हिंदू भूषण ट्रस्टच्या सर्व पदाधिकाऱ्यांना गौरविण्यात आले आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

## 'त्या' नराधमांचा चौरंग्या केल्याशिवाय राहणार नाही..!

महाराष्ट्रातील सध्याची परिस्थिती पाहता आमच्या माता-भगिनींवर अन्याय होतो. अशावेळी धर्मवीर छत्रपती श्री. संभाजी महाराज यांना स्मरून सांगतो. ट्रस्टच्या माध्यमातून मी आणि माझे सहकारी या अन्यायाच्या विरोधात आक्रमक भूमिका घेताना दिसतील. वालचंद नगर येथे एका गतिमंद मुलीबाबत अत्याचाराचा प्रकार घडला. असा प्रकार आपल्या घरातील व्यक्तीसोबत घडला असता, तर आपण गप्प बसलो असतो का? यापुढील काळात माता-भगिनींवर कोणत्याही प्रकारचा अन्याय झाला, तर पोलिसांपर्यंत जायची ही गरज लागणार नाही महेश लांडगे आणि त्यांचे सहकारी अशा नराधमांचा चौरंग्या केल्याशिवाय राहणार नाही, असे आक्रमक भाषण हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष आमदार महेश लांडगे यांनी केले.

**कारवाईचा बडगा** दोन इमारती जमीनदोस्त; २० इमारतींना नोटीस...

# कोंढव्यातील बेकायदा बांधकामावर हातोडा!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोंढवा खुर्द परिसरातील अनधिकृत बांधकामांवर महापालिकेने कारवाई सुरूच ठेवली आहे. शुक्रवारी (१२ सप्टेंबर) महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या विशेष पथकाने या परिसरातील शिवनेरीनगर, गल्ली क्रमांक १ येथे उभारण्यात आलेल्या पाच मजल्यांच्या दोन इमारतींसह सुमारे १५ हजार चौरस फूट आरसीसी बांधकाम जमीनदोस्त केले.**

## अनधिकृत बांधकामांवर कारवाई




## पाच मजली इमारती जमीनदोस्त

बांधकामे करताना पालिकेची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही. येथील सदनिका या मोठ्या रक्कमेत विकल्या जात असल्याने नागरिकांची मोठी फसवणूक होत आहे.या बाबतच्या अनेक तक्रारी महापालिकेकडे करण्यात आल्या आहेत. या तक्रारींची दखल घेत महापालिकेच्या बांधकाम विभागाने कोंढवा येथील अतिक्रमण करून बांधण्यात आलेल्या बांधकामावर कारवाई सुरू केली आहे. गणेशोत्सवाच्या काळात महापालिकेने ही कारवाई थांबविली होती.

शहरातील विविध भागांतील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून ही कारवाई सुरू आहे. कोंढवा खुर्द भागात देखील मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहे. बांधकामे करताना पालिकेची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही. येथील सदनिका या मोठ्या रक्कमेत विकल्या जात असल्याने नागरिकांची मोठी फसवणूक होत आहे. या बाबतच्या अनेक तक्रारी महापालिकेकडे करण्यात आल्या आहेत. या तक्रारींची दखल घेत महापालिकेच्या बांधकाम विभागाने कोंढवा येथील अतिक्रमण करून बांधण्यात आलेल्या बांधकामावर कारवाई सुरू केली आहे. गणेशोत्सवाच्या काळात महापालिकेने ही कारवाई थांबविली होती. मात्र, आता पुन्हा ही कारवाई सुरू करण्यात आली आहे.कारवाई करण्यात आलेल्या इमारतींचा वापर किंवा वास्तव्य करू नये. तसेच या सदनिका खरेदी करू नयेत, असे आवाहन पुणे महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.महापालिकेने कोंढवा परिसरातील अनधिकृत २० इमारतींना नोटीस बजाविल्या आहेत. या सर्व इमारती पाडण्यात येणार आहेत. नागरिकांनी या इमारतींमधील सदनिका खरेदी करू नयेत. कोंढवा खुर्द परिसरातील अनधिकृत बांधकामांवर महापालिकेने कारवाई सुरूच ठेवली आहे. शुक्रवारी (१२ सप्टेंबर) महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या विशेष पथकाने या परिसरातील शिवनेरीनगर, गल्ली क्रमांक १ येथे उभारण्यात आलेल्या पाच मजल्यांच्या दोन इमारतींसह सुमारे १५ हजार चौरस फूट आरसीसी बांधकाम जमीनदोस्त केले. शहरातील विविध भागांतील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून ही कारवाई सुरू आहे.

कोंढवा खुर्द भागात देखील मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहे. बांधकामे करताना पालिकेची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही. येथील सदनिका या मोठ्या रक्कमेत विकल्या जात असल्याने नागरिकांची मोठी फसवणूक होत आहे. या बाबतच्या अनेक तक्रारी महापालिकेकडे करण्यात आल्या आहेत. या तक्रारींची दखल घेत महापालिकेच्या बांधकाम विभागाने कोंढवा येथील अतिक्रमण करून बांधण्यात आलेल्या बांधकामावर कारवाई सुरू केली आहे. गणेशोत्सवाच्या काळात महापालिकेने ही कारवाई थांबविली होती. मात्र, आता पुन्हा ही कारवाई सुरू करण्यात आली आहे.कारवाई करण्यात आलेल्या इमारतींचा वापर किंवा वास्तव्य करू नये. तसेच या सदनिका खरेदी करू नयेत, असे आवाहन पुणे महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.महापालिकेने कोंढवा परिसरातील अनधिकृत २० इमारतींना नोटीस बजाविल्या आहेत. या सर्व इमारती पाडण्यात येणार आहेत. नागरिकांनी या इमारतींमधील सदनिका खरेदी करू नयेत. कोंढवा खुर्द परिसरातील अनधिकृत बांधकामांवर महापालिकेने कारवाई सुरूच ठेवली आहे. शुक्रवारी (१२ सप्टेंबर) महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या विशेष पथकाने या परिसरातील शिवनेरीनगर, गल्ली क्रमांक १ येथे उभारण्यात आलेल्या पाच मजल्यांच्या दोन इमारतींसह सुमारे १५ हजार चौरस फूट आरसीसी बांधकाम जमीनदोस्त केले.बांधकामांवर कारवाई करण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून ही कारवाई सुरू आहे. कोंढवा खुर्द भागात देखील मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहे.

# ‘जीएसटी’ दरकपात हा समृद्धीचा महामार्ग

## भाजपाचे सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांचा दावा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**केंद्रीय वस्तू आणि सेवा करांच्या (जीएसटी) पुनर्रचना व अधिक सुसूत्रीकरण करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेल्या निर्णयामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेबरोबरच जनतेच्या जीवनशैलीला देखील नवी चालना मिळणार आहे, असा दावा भारतीय जनता पक्षाचे सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.**




## नागरिकाचे जीवनमान उंचावणार

जीएसटीमध्ये करण्यात आलेल्या बदलामुळे सामान्य माणूस, शेतकरी, मध्यम व लघु उद्योगक्षेत्र, मध्यमवर्गीय समाजघटक, महिला आणि युवावर्गाला फायदा होणार आहे. या सुधारणेमुळे नागरिक केंद्रीत उत्क्रांतीची सुरुवात झाली असून समाजाच्या अखेरच्या स्तरापर्यंतच्या प्रत्येक नागरिकाचे जीवनमान उंचावणार आहे, असे पाठक यांनी सांगितले.

जीएसटीमध्ये करण्यात आलेल्या बदलामुळे सामान्य माणूस, शेतकरी, मध्यम व लघु उद्योगक्षेत्र, मध्यमवर्गीय समाजघटक, महिला आणि युवावर्गाला फायदा होणार आहे. या सुधारणेमुळे नागरिक केंद्रीत उत्क्रांतीची सुरुवात झाली असून समाजाच्या अखेरच्या स्तरापर्यंतच्या प्रत्येक नागरिकाचे जीवनमान उंचावणार आहे, असे पाठक यांनी सांगितले. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, सरचिटणीस रवींद्र साळेगावकर, पश्चिम महाराष्ट्र माध्यम प्रमुख अमोल कविटकर, प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर, हेमंत लेले, पुष्कर तुळजापूरकर उपस्थित होते.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून २०१४ पर्यंत देशाच्या आर्थिक वाटचालीचा वेग संथ राहिला होता. या काळात भ्रष्टाचार आणि महागाई गगनाला भिडली होती. कर संकलनाची प्रक्रिया क्लिष्ट होती, अर्थकारणात पारदर्शकताही नव्हती. मात्र मोदी सरकारने हे ओळखून सुधारणांना बळ देणाऱ्या योजना आखल्या व त्यांच्या अंमलबजावणीवरही लक्ष केंद्रीत केले. त्यामुळेच आज देशातील २५ कोटी लोकसंख्या दारिद्र्यरेषेखालून बाहेर आली असून देशाची अर्थव्यवस्था जागतिक स्तरावर चौथ्या क्रमांकावर पोहोचली आहे, असे पाठक म्हणाले.

# गगनभेदी मानवंदना, हजारो झाले नतमस्तक!



स्टॅच्यू ऑफ हिंदुस्तान अर्थात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे पूर्णाकृती शिल्प मोशी येथे साकारत असून रविवारी या पूर्णाकृती शिल्पाला मानवंदना देण्यासाठी राज्यभरातून शिव शंभुप्रेमी, ढोल ताशा पथक आमंत्रित करण्यात आले होते. मर्दानी खेळ, मावळ्यांची चित्त थरारक प्रात्यक्षिके आणि शिव गीतांची गर्जना यामुळे अवघे पिंपरी चिंचवडचे वातावरण शिवमय झाले. न भूतो न भविष्यती असा अनुपम्य सोहळा या निमित्ताने हजारो शिवशंभु प्रेमींनी अनुभवला. अवघे पिंपरी चिंचवड या सोहळ्याचे साक्षीदार ठरले. या सोहळ्याची काही क्षणचित्रे 'महा ई न्यूज'च्या वाचकांसाठी..

मोशी येथे उभारण्यात आलेल्या जगातील सर्वात उंच स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण अर्थात धर्मवीर संभाजी महाराज पूर्णाकृती शिल्पासाठी रविवारी मानवंदना देण्यात आली. या मानवंदनेसाठी शिवशंभु प्रेमी, ढोल ताशा पथक, नागरिक हजारो संख्येने उपस्थित होते.



शिव गीत गायक अवधूत गांधी यांनी आपल्या भारदस्त आवाजात श्री छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या गीत गायनाने वातावरण मंत्रमुग्ध केले.



मोशी येथे उभारण्यात आलेल्या जगातील सर्वात उंच स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण अर्थात धर्मवीर संभाजी महाराज पूर्णाकृती शिल्पासाठी रविवारी मानवंदना देण्यात आली. हे जगातील सर्वात उंच शिल्प ठरले असून याची नोंद लंडन बुक ऑफ रेकॉर्ड यांच्या द्वारा करण्यात आली. हा विक्रम प्रस्थापित करण्याचा मान या निमित्ताने पिंपरी चिंचवड करांना मिळाला आहे.



स्टॅच्यू ऑफ हिंदुस्तान अर्थात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे पूर्णाकृती शिल्प मोशी येथे साकारत असून रविवारी या पूर्णाकृती शिल्पाला मानवंदना देण्यासाठी राज्यभरातून शिवशंभु प्रेमी, ढोल ताशा पथक आमंत्रित करण्यात आले होते. याच वेळेला वरुण राजाने लावलेली हजेरी, सूर्याची प्रसन्न किरणे आणि शंभूराजांचा भव्य पुतळा यांचे लोभस रूप पाहायला मिळाले.




**भारतीय संस्कृतीतील सर्वाधिक लोकप्रिय उत्सवांपैकी एक म्हणजे गणेशोत्सव. महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात हा उत्सव जल्लोषात, भक्तिभावात आणि सामूहिकतेच्या भावनेत साजरा होतो. हा सण सर्व समाजात आणि घराघरात लोकप्रिय आहे. या उत्सवाचा इतिहास केवळ धार्मिकतेशी जोडलेला नसून, त्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक आयामही गुंफलेले आहेत.**

# गणेशोत्सव : 'राज्य महोत्सव'पर्यंतचा प्रवास



लोकमान्य टिळकांनी जुलमी ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनजागृती व जनतेला संघटित करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्याची प्रथा सुरू केली.या माध्यमातून सामाजिक एकोपा संघटनात्मक चळवळी तसेच कला व सांस्कृतिक उपक्रम सुरु करण्याचे त्यांचे धोरण होते. महाराष्ट्र शासनाने आता एक पाऊल पुढे टाकत या गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून मान्यता दिली आहे. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव राज्य वैभवी बाण्यामध्ये महाराष्ट्रात सर्वत्र सुरु आहे.सन 1893 साली लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. त्या काळात ब्रिटिश सत्तेखाली भारतीय समाज उभारी घेऊ शकत नव्हता. सामूहिक संघटनेला दडपशाही होती. परंतु टिळकांनी गणेश उत्सव हा घराघरातील कौटुंबिक वातावरणातून बाहेर आणला आणि त्याला सार्वजनिक व्यासपीठ दिले. हा निर्णय केवळ धार्मिक नव्हता तर सामाजिक एकात्मता आणि राजकीय जागृती घडवून आणणारा होता. मंदिरात किंवा घरात मर्यादित राहिलेला आनंद लोकांच्या,समूहांच्या विविध जाती-पंथांच्या मान्यतेला उतरला. उत्सवाचे सार्वत्रिकरण झाले.पुढे हळूहळू समाजाला एकत्र आणणारा हा उपक्रम बनला. महाराष्ट्रातील विविध भागांत गणेशोत्सव वेगवेगळ्या पद्धतींनी साजरा केला जातो. कोकणात हा उत्सव संस्कृतीला उजाळा देणारा असतो. गावी जाऊन कुटुंबासोबत उत्सव साजरा करणे ही कोकणातील वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. नारळी पोर्णिमा ते विसर्जनापर्यंत निसर्ग, समुद्रकिनारे आणि पारंपरिक घरगुती पूजा यामध्ये एक विलक्षण उत्साह व एकोप्याचे वातावरण अनुभवता येते. या भागातील मूळ कला संस्कृतीची जोपासना व सादरीकरण या काळामध्ये केली जाते. विदर्भ, मराठवाड्यात नाटक, कला, संस्कृती, कवी संमेलन आणि विविध गुण प्रदर्शनाचे आयोजन करणारा महोत्सव म्हणजे गणेश महोत्सव नागपूर, अकोला,अमरावती, चंद्रपूर यांसारख्या शहरांमध्ये गणेशोत्सवाला विसर्जन मिरवणुकीला अनेक वर्षांची परंपरा आहे. विदर्भातील अनेक नामवंत व्याख्यानमाला या काळामध्ये आयोजित केल्या जातात.सांस्कृतिक कार्यक्रमांची सर्वाधिक रेलचेल या काळात असते. पुण्यातील अनेक ऐतिहासिक गणपती मंडळांना शंभर वर्षांहून अधिक परंपरा आहे. अनेक मानाची मंडळे आजही परंपरेचे जतन करतात. सांस्कृतिक स्पर्धा, नाटकं, कीर्तनं आणि शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम हे वैशिष्ट्य येथे जपले जाते.देश विदेशातील कलाकारांना स्थान देणारे अनेक फेस्टिवल, उत्सव,कार्यक्रम या काळात पुण्यामध्ये साजरे होतात. पुण्यातला गणेशोत्सव बघायला देशभरातून नागरिक या काळात पुण्यामध्ये येत असतात. मुंबई म्हणजे गणेशोत्सवाचा महासागर, गिरगावातून सुरु झालेला हा सार्वजनिक उपक्रम या महानगराची ओळख झाला आहे. चाकरमान्यांची सुट्टी, बाजारपेठेत वाढलेली उलाढाल आणि कला-उद्योगाला मिळणारी चालना यामुळे मुंबईतील गणेशोत्सवाला खास आर्थिक महत्त्व आहे. महाराष्ट्रातील सिने, नाट्य कलावंतांचे शहर असणाऱ्या मुंबईमध्ये कला जगताने देखील गणेश उत्सवाला चालना दिली आहे.मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी देखील या काळात बाप्पा विराजमान असतात. प्रत्येक सोसायटीत होणारा गणेशोत्सव, सार्वजनिक सहभागाचे आदर्श उदाहरण ठरते. शिवाय सांस्कृतिक देवाणघेवाण आणि देशभराच्या खाद्य संस्कृतीलाही चालना मिळते.

गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे पूजा किंवा कर्मकांडामध्ये कोणतीही अनिवार्यता नाही. कोणत्याही जाती, धर्मातील व्यक्ती या उत्सवात सहभागी होऊ शकतात. म्हणूनच हा उत्सव एका धार्मिक मर्यादेपलीकडे जाऊन सामूहिक वार्षिक आनंदोत्सवाचे स्वरूप धारण करतो. दीड दिवस, अडीच दिवस, पाच दिवस, दहा दिवस अशा विविध कालावधीत हा उत्सव आपआपल्या पध्दतीने साजरा केला जातो.

## प्रासंगिक »

### भाजप नाते !

***राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही भाजप आणि परिवाराची मातृसंस्था असल्याचे सांगितले जात असले, तरी संघ मात्र त्याचा वारंवार इन्कार करतो.***

संघाच्या दारी भाजप आणि परिवारातील नेते वारंवार हजेरी लावतात. भाजपही कोणतीही महत्त्वाची पदे देताना संघाचा स्वयंसेवक ही पात्रता महत्त्वाची मानतो. असे असताना सरसंघचालक मोहन भागवत अलिकडे वारंवार कोणत्याही संघटनेवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर नसल्याचे सांगतात. संघाच्या शताब्दी वर्षात भागवत यांनी यांच्या दिल्लीच्या भाषणातून त्यांनी सर्वव्यापकता दाखवून देताना भाजपशी दोन हात दूर असल्याचे संकेत दिले. हिंदू राष्ट्र' म्हणजे कोणताही प्रदेश किंवा राजकीय सत्ता नाही. याचा अर्थ भेदभाव न करता सर्वांना न्याय मिळवून देणे असा आहे. मग तो कोणताही धर्म असो, भाषा असो किंवा विचारसरणी. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'संघाचा शंभर वर्षांचा प्रवास: नवीन क्षितीज' या शताब्दी व्याख्यानमालेच्या उद्घाटनादरम्यान सरसंघचालक मोहन भागवत यांनी हा सूर लावला.

संघर्ष अशा चढउतारांनी या दोन मोठ्या अर्थव्यवस्थांच्या संबंधांच्या इतिहासाची पाने भरलेली आहेत; पण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा संरक्षणवादी धोरणाचा अवलंब करत भारतीय निर्यातीवर दंडात्मक शुल्क आकारण्याचा निर्णय घेतल्याने आता या संबंधांमध्ये कटुतेचे एक नवे पर्व सुरू झाल्याचे दिसत आहे.

# टॅरिफचे आव्हान आणि भारत




५० टक्के टॅरफ आकारणीमुळे भारतासमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे. ट्रम्प यांचा दावा आहे की, अमेरिकन बाजारपेठेत स्वस्त दराने घुसणाऱ्या विदेशी वस्तूंमुळे स्थानिक रोजगार आणि उद्योग धोक्यात आले आहेत. त्यामुळे आयातीवर कठोर टॅरफ लावून रोजगार वाचवणे आणि स्थानिक उत्पादनास चालना देणे हेच त्यांचे उद्दिष्ट आहे. या निर्णयाचा फटका भारताला बसणार आहे, हे वास्तव दुर्लक्षिता येणार नाही. भारतातून अमेरिकेला जाणारी निर्यात मोठ्या प्रमाणावर आहे. विशेषतः रेडिमेड वस्त्रे, ॲपरेल्स, पादत्राणे, औषधनिर्मिती, कृषी उत्पादनं, समुद्री अन्नपदार्थ, रसायने, मशिनरी आणि ऑटो पार्टस् या क्षेत्रांवर सर्वाधिक अवलंबित्व आहे. टैरिफमुळे या सर्व क्षेत्रांना मोठा धक्का बसणार आहे. सरकारी आकडेवारीनुसार जवळपास ४८ अब्ज डॉलरच्या भारतीय निर्यातीवर हा परिणाम होईल. वस्त्रोउद्योग आणि पादत्राणे यांसारख्या रोजगारकेंद्रित क्षेत्रांवर त्याचा सर्वाधिक आघात होणार असून सुमारे ७ लाख लोकांच्या नोकऱ्यांना थेट धोका निर्माण होईल. राजस्थानासारख्या राज्यांत तर याचा परिणाम अधिक गंभीर स्वरूपात दिसेल. तेथील कापड आणि वस्त्रोद्योग, रत्नजडित दागिन्यांचा व्यापार, हडिक्राफ्टस् व औषध उद्योग हे सर्वाधिक निर्याताभिमुख आहेत. एका अंदाजानुसार फक्त राजस्थानच्या १८ हजार कोटी रुपयांच्या

टैरिफ आकारणीमुळे भारत-अमेरिका संबंध नव्या वळणावर पोहोचले आहेत. त्यांचे भवितव्य काय असेल, यापेक्षाही या निर्णयामुळे होणाऱ्या परिणामांचा विचार अधिक महत्त्वाचा आहे. टॅरिफमुळे ४८ अब्ज डॉलरच्या निर्यातीला तडाखा बसेल. यामध्ये रेडिमेड कपड्यांवर ६१ टक्के टॅरिफ आकारणी केली जाणार असल्याने १०.८ अब्ज डॉलरची वस्त्रोद्योगाची निर्यात प्रभावित होणार आहे.निर्यातीवर संकट ओढवणार आहे. यामुळे सुमारे ६, २०० कोटी रुपयांचा वस्त्रोद्योग, ५००० कोटी रुपयांचे रत्नजडित दागिने, ६००० कोटी रुपयांचे हॅंडिक्राफ्टस् आणि २५०० कोटी रुपयांचे औषध क्षेत्र प्रभावित होईल. यातील अनेक उद्योग ग्रामीण व अर्धशहरी भागांत चालतात. त्यामुळे हजारो कारागीर, लघुउद्योग व कुटुंबे थेट बेरोजगारीच्या संकटात सापडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अमेरिकेच्या या नव्या धोरणामुळे विविध क्षेत्रांवरील कर दर प्रचंड प्रमाणात वाढले आहेत. कृषी उत्पादनांवर आणि मसाल्यांवर ५० टक्क्यांपर्यंत, ऑटो पार्टस्वर ५२ टक्क्यांपर्यंत, फुटवेअरवर ५२ टक्क्यपिक्षा अधिक, मशिनरीवर ५१ टक्के, फर्निचरवर ५२ टक्के, रसायनांवर ५३ टक्के आणि कपडे व वस्त्रांवर सुमारे ६१ टक्के शुल्क वाढवले आहे. या वाढलेल्या शुल्काचा परिणाम आकडेवारीत मांडला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

शिवसेना ठाकरे गटाकडून तीव्र विरोध भारत-पाकिस्तान क्रिकेट सामना खेळवण्याच्या निर्णयाचा निषेध

# ‘माझं कुंकू, माझा देश’ आंदोलन!

## भारत- पाक सामन्यावरून राज्यभरात केंद्र सरकारविरोधात निदर्शने

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारत-पाकिस्तान क्रिकेट सामना खेळवण्याच्या निर्णयाविरोधात शिवसेना ठाकरे गटाकडून तीव्र विरोध दर्शविण्यात आला. त्यासाठी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी रविवारी राज्यभरात ठिकठिकाणी ‘माझं कुंकू, माझा देश’ आंदोलन पुकारत निदर्शने केली.**






केंद्र सरकारने या सामन्याला परवानगी देणे म्हणजे त्यांच्या राष्ट्रभक्तीची दिवाळखोरी आहे. अमित शहा यांचे पुत्र आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) अध्यक्ष जय शहा यांच्या दबावामुळेच हा सामना खेळला जात असल्याचा आरोप या वेळी ठाकरे गटाकडून करण्यात आला.

आशिया चषक स्पर्धेसाठी अबुधाबी येथे झालेल्या भारत-पाकिस्तान सामन्याविरोधात राज्यभरात झालेल्या या आंदोलनात शिवसेना ठाकरे गटाला काही ठिकाणी मनसे आणि कॉँग्रेसचीही साथ लाभली. या सामन्याबाबत निषेध नोंदवताना बीसीसीआयला भीक लागली आहे असे सांगत अनेक ठिकाणी प्रतीकात्मकरीत्या वर्गणीही गोळा करण्यात आली. आम्ही वर्गणी देऊ पण सामना खेळू नका, अशी टीका या वेळी करण्यात आली.

### सरकारचे देशभक्तीचे ढोंग – संजय राऊत

पहलगाम हल्ल्यात आमचे २६ जण ठार झाले. त्यांच्या पत्नीच्या कपाळावरील कुंकू पुसले गेले. त्यावर नरेंद्र मोदी यांच्या सरकारने राजकीय ढोंग केले आहे. यापूर्वी अशा आंतरराष्ट्रीय सामन्यांतून भारताने माघार घेतली आहे. भाजपचे ‘पापा’ पाकिस्तानविरोधातील युद्ध थांबवू शकतात, युक्रेनचे वॉर थांबवू शकतात, पण भारत-पाकिस्तान क्रिकेट सामना थांबवू शकत नाहीत का, असा सवालही त्यांनी केला. या सामन्याविषयी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या वक्तव्यावरून महाराष्ट्राचा मंत्री भारत-पाक सामना पाहण्याची भाषा वापरत असेल तर ती राष्ट्रभक्त नागरिकाची भाषा नाही, अशी टीकाही त्यांनी केली. खेळाकडे खेळाच्या नजरेतून बघावे की न बघावे हा प्रत्येकाचा अधिकार आहे.

### काही ठिकाणी मनसे व कॉँग्रेसची साथ

आंदोलनाला राज्यभर चांगला प्रतिसाद
संजय राऊत यांची टीका
“सरकारचे देशभक्तीचे ढोंग उघड झाले”
“पहलगाम हल्ल्यात २६ जवान शहीद झाले; त्यांच्या पत्नींच्या कपाळावरील कुंकू पुसले गेले”
“भारत–पाक सामना थांबवता येत नाही का?” – सवाल
अजित पवार यांच्या वक्तव्यावरही टीका :
“ही राष्ट्रभक्त नागरिकाची भाषा नाही”

# रायगडमधील महिला बचत गटांना गणराया पावला...

## गणेशमूर्ती विक्रीतून महिलांची तब्बल 13 कोटींची उलाढाल

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अलिबाग: रायगड जिल्ह्यात महिला बचत गटांना गणराया पावला आहे. गणेशमूर्ती व्यवसायातून बचत गटांनी यंदा तब्बल १३ कोटी १३ लाख रुपयांची उलाढाल केली आहे. त्यामुळे बचत गटातील महिलांना आर्थिक स्तर उंचावण्यास मदत झाली आहे.उमेद अभियाना अंतर्गत महिला बचत गटांना गणेशमूर्ती व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहन आणि प्रशिक्षण देण्यात आले होते. याचे सकारात्मक परिणाम आता समोर आले आहेत.**



> “ गणेशमूर्ती व्यवसायामधील संधी ओळखून महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्याचे त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि अर्थसहाय्य देण्यासाठी प्रयत्न केले गेले. त्याचे चांगले परिणाम दिसून आले आहेत.
>
> – **नेहा भोसले,** मुख्य कार्यकारी अधिकारी राजिप.

महिला बचत गटांच्या माध्यमातून जिल्ह्यातील विवीध भागात महिलांकडून १ लाख ६६ हजार ८३३ गणेशमूर्ती तयार करून घेण्यात आला होत्या. ज्यांची गणेशोत्सवा दरम्यान विक्री करण्यात आली. यातून तब्बल १३ कोटी १३ लक्ष रुपयांची उलाढाल झाली.

रायगड जिल्ह्यातील पेण तालुका गणपती मूर्तींचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. पेणमध्ये तयार केलेल्या गणपती मूर्तींना देश, विदेशात मोठी मागणी आहे. सुबक आखणी, नेटकी बैठक, सुंदर कोरीवकाम, रेखीव डोळ्यांची रचना आणि रंगकाम यामुळे पेणच्या गणपती मूर्तींना स्वतची खास ओळख प्राप्त झाली असून, गणपती मूर्तींना गणेशमूर्तींना भौगोलिक मानांकन मिळाले आहे. त्यामुळे या व्यवसायातील रोजगार संधी ओळखून पेण आणि जिल्ह्यातील इतर तालुक्यातील महिला महिला बचतगटांना सक्रीय करण्यात आले. व्यवसायासाठी उमेद अभियानमार्फत महिला बचत गटांना फिरता निधी तसेच ग्राम संघांना समुदाय गुंतवणूक निधी आणि बँकांमार्फत पतपुरवठा करण्यात आला, त्यामुळे महिलांच्या या व्यवसायाला गती प्राप्त झाली आहे.

### तालुका – गणेशमूर्तींची विक्री – उलाढाल

| | | |
|---|---|---|
| अलिबाग | – १,२७७ | – ८ लाख १५ हजार |
| कर्जत | – ३,४५० | – ३० लाख ५० हजार |
| खालापूर | – १५० | – २ लाख ३० हजार |
| महाड | – ३२० | – २ लाख ५० हजार |
| मागणाव | – ४२० | – ३ लाख ४५ हजार |
| म्हसळा | – ३५८ | – २ लाख ९६ हजार |
| मुरुड | – ६५० | – १६ लाख २५ हजार |
| पनवेल | – २२० | – ६ लाख ४५ हजार |
| पेण | – १ लाख ६८ हजार | – १२ कोटी २१ लाख |
| पोलादपूर | – १३५ | – १ लाख ६५ हजार |
| रोहा | – ९८ | – ६० हजार |
| श्रीवर्धन | – ४५० | – ६ लाख ६५ हजार |
| सुधागड | – १०० | – ७० हजार |
| तळा | – १३८ | – २ लाख ६० हजार |
| उरण | – ९६५ | – ७ लाख १५ हजार |

काँग्रेसवर जोरदार टीका

पंतप्रधान मोदींचा गंभीर आरोप

# काँग्रेसचा दहशतवाद्यांना पाठिंबा!

## आसाममध्ये हजारो कोटींच्या प्रकल्पांची पायाभरणी

।मंगलदोई (आसाम)। वृत्तसंस्था : महाईन्यूज

**"काँग्रेस पक्ष भारतीय लष्कराला पाठिंबा देण्याऐवजी पाकिस्तानने प्रशिक्षण देऊन तयार केलेल्या दहशतवाद्यांना पाठिंबा देतो," असा गंभीर आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केला. आसामच्या दरांग जिल्ह्यातील मंगलदोई येथे आयोजित कार्यक्रमात भाषण करताना, पंतप्रधानांनी काँग्रेसवर घुसखोर व देशविरोधी शक्तींचे संरक्षण करत असल्याचा आरोप केला.**



आसाममध्ये पुढील वर्षाच्या सुरुवातीला विधानसभा निवडणूक होत आहे. त्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांच्या दौऱ्याला महत्त्व प्राप्त झाले होते. पंतप्रधानांनी आपल्या भाषणांमध्ये 'ऑपरेशन सिंदूर', आसाममधील घुसखोरी, लोकसंख्येचे स्वरूप बदलण्याचा कथित प्रयत्न, दिवंगत गायक भूपेन हजारिका यांचा काँग्रेसकडून कथित अपमान, विकास इत्यादी मुद्दे समाविष्ट केले. कामाख्यादेवीच्या कृपेने 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी झाले अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

"भाजप घुसघोरांना जमीन बळकावू देणार नाही आणि लोकसंख्येचे स्वरूप बदलण्याचे कारस्थान रचू देणार नाही," असे मोदी म्हणाले. मुख्यमंत्री हिमांता बिस्वा सरमा हे घुसखोरांना हुसकावून लावत आहेत आणि त्यांनी अतिक्रमणात बळकावलेली जागा शेतकऱ्यांना कसण्यासाठी देत आहेत, अशी प्रशंसा पंतप्रधानांनी केली. घुसखोरीचे आव्हान पाहता देशभरात लोकसांख्यिकी मोहीम राबवली जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

मोदी यांनी १९६२च्या चिनी आक्रमणाबद्दल टिप्पणी करत प्रथम पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना पुन्हा एकदा लक्ष्य केले. काँग्रेसची आसामवर अनेक दशके सत्ता होती, पण त्यांनी ब्रह्मपुत्रा नदीवर तीनच पूल बांधले, तर भाजपने गेल्या १० वर्षांमध्ये सहा पूल बांधले असे ते म्हणाले. आसामच्या विकासाचा दर १३ टक्के असून ईशान्य भारत विकसित भारताच्या स्वप्नात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे मोदींनी सांगितले.

> 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या पायाभूत सुविधा नष्ट करणाऱ्या आपल्या सैन्याला पाठिंबा देण्याऐवजी, काँग्रेस घुसखोर आणि देशविरोधी शक्तींचे संरक्षण करत होती.
> **- नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

### आसामचा गौरव

पंतप्रधान मोदींनी सांगितले की, केंद्र सरकारने आसामचे महान गायक भूपेन हजारिका यांना भारतरत्न देण्याचा निर्णय घेतल्यानंतर, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांनी त्यांना काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खरगे यांचे एक वक्तव्य दाखवले होते.

पंतप्रधान म्हणाले की, ज्या दिवशी भारत सरकारने या देशाचा महान सुपुत्र आणि आसामचा गौरव असलेले भूपेन हजारिका यांना भारतरत्न देऊन सन्मानित केले, त्याच दिवशी काँग्रेस अध्यक्षांनी, मोदी गायक आणि नर्तकांना हा पुरस्कार देत आहेत. खरगे यांनी हे विधान २०१९ मध्ये केले होते. वाद झाल्यानंतर त्यांनी याबाबत स्पष्टीकरण देखील दिले होते.

**१२,३०० कोटींचे प्रकल्प**

पंतप्रधान मोदी यांनी आसाममध्ये विविध ठिकाणी एकूण १२,३०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन केले. हा शून्य कचरा निर्मिती करणारा प्रकल्प असून या प्रकल्पाचा ५० हजारांपेक्षा जास्त लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष फायदा होईल असे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यांनी गोलघाट जिल्ह्यातील नुमलीगढ येथे ५,००० कोटींच्या बांबूआधारित इथेनॉल प्रकल्पाचे उद्घाटन केले. तसेच त्यांनी नुमलीगढ रिफायनरी येथे ७,२३० कोटींच्या पेट्रो फ्लुइडाइज्ड कॅटॅलिक क्रॅकर युनिटची पायाभरणी केली.

# रशियाच्या मोठ्या रिफायनरीवर युक्रेनचा हल्ला

## सततच्या ड्रोन हल्ल्यांमुळे रशियात इंधन तुटवडा

।नवी दिल्ली। वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रशिया आणि युक्रेन यांच्यात २०२२ पासून युद्ध सुरू आहे. साडे तीन वर्षांहून अधिक काळ सुरू असलेले हे युद्ध थांबविण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प प्रयत्न करत आहेत. नुकतेच त्यांनी रशिया आणि युक्रेनच्या राष्ट्राध्यक्षांची भेट घडवून आणणार असल्याचे सांगितले होते. मात्र भूराजकीय घटना वेगाने बदलत असून आता युक्रेनने रशियाच्या मोठ्या तेल शुद्धीकरण प्रकल्पावर ड्रोन हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. रशियाने या वृत्ताला दुजोरा दिला आहे.**




ब्लुमबर्गने दिलेल्या वृत्तानुसार, युक्रेनच्या लष्कराने शनिवारी रात्री लेनिनग्राड प्रदेशातील किरीशी तेल शुद्धीकरण (रिफायनरी) प्रकल्पाला लक्ष्य केले. या प्रकल्पातून दरवर्षी सुमारे १७.७ दशलक्ष मेट्रिक टन आणि दररोज ३,५५,००० बॅरल कच्च्या तेलावर प्रक्रिया केली जाते. कच्च्या तेलाच्या उत्पादामध्ये रशियाच्या पहिल्या तीन प्रकल्पात या प्लांटचा समावेश होतो.

लेनिनग्राडचे प्रांतिय गव्हर्नर अलेक्झांडर ड्रोझडेन्को यांनी दिलेल्या माहितीनुसार, किरिशी परिसरात युक्रेनचे तीन ड्रोन पाडण्यात आले. ड्रोनचे ढिगारे पडल्यानंतर आग लागली. असोशिएटेड प्रेसने (एपी) दिलेल्या बातमीनुसार, या हल्ल्यात कुणीही जखमी झालेले नाही. तसेच आग विझविण्यात यश आले आहे.

### रशियाची पुरवठा साखली उध्वस्त

रशियात सध्या इंधन तुटवडा भासत असताना हा हल्ला करण्यात आला आहे. रशियातील अनेक पेट्रोल पंपाबाहेर वाहनांच्या लांब रांगा लागल्या आहेत. रशियाने मागच्या आठवड्यात पेट्रोलची निर्यात स्थगित केली असून ३० सप्टेंबरपर्यंत पूर्ण बंदी करण्यात येणार आहे. तर ३१ ऑक्टोबरपर्यंत निर्यातीवर अंशतः निर्बंद लावले जाणार आहेत. रशिया हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा कच्च्या तेलाचा निर्यातदार आहे. मात्र अलीकडे युक्रेनच्या ड्रोन हल्ल्यामुळे पुरवठा साखळीमध्ये व्यत्यय येत आहे. त्यामुळे रशियात टंचाई निर्माण झाली आहे, असे एपी वृत्तसंस्थेने म्हटले आहे.

# ‘या’ रस्त्याला दिले दिवंगत अभिनेते रमेश देव यांचे नाव

मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते तब्बल सहा दशके चतुरस्र कामगिरी करणारे ज्येष्ठ अभिनेते कै. रमेश देव(RAMESH DEO) यांच्या ९६ व्या जयंती दिनानिमित्ताने अंधेरी पश्चिम, वर्सोवा येथील रस्त्याचे ‘अभिनेते श्री. रमेश देव मार्ग’ असे नामकरण करण्यात आले.मराठी चित्रपटसृष्टीतील नामवंतांचा गौरव करण्यासाठी ‘मराठी चित्रपट कट्टा’चे लोकार्पण आणि रस्त्याचे नामकरण सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी म्हटले, “मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत अभिनेते रमेश देव यांची महती खूप आहे, या महान कलाकाराच्या नावाचा मार्ग होणे हे समस्त महाराष्ट्रासाठी आणि कलेवर प्रेम करणाऱ्या सर्वांना आनंद देणारा दिवस आहे. ‘मराठी चित्रपट कट्टा’च्या निमित्ताने मराठी चित्रपटसृष्टीतील नामवंतांचा सन्मान करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी आमदार अमित साटम, नगरसेवक रोहन राठोड या प्रत्येकाने आपल्यापरीने केलेलं काम महत्त्वपूर्ण आहे.” मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी केलेले प्रयत्न आज यशस्वी झाले त्याचा अभिमान




असल्याचे वक्तव्य केले.याप्रसंगी बोलताना अभिनेते अजिंक्य देव यांनी म्हणाले, “आज संपूर्ण देव कुटुंबियांसाठी हा स्वप्नपूर्तीचा आणि आनंदाचा दिवस आहे. आज बाबांच्या प्रेमापोटी इथे उपस्थित असलेल्या सर्वांचे मी आभार मानतो. बाबांच्या नावाचा मार्ग झाला याचा खूप आनंद झाला आहे. यासाठी मी सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, भाजप नेते विनोद तावडे, आमदार अमित साटम, नगरसेवक रोहन राठोड यांचे मनःपूर्वक आभार मानतो. या प्रस्तावावर त्यांनी विचार करून पुढाकार घेत यासाठी परवानगी दिली. हे बाबांचे आशीर्वाद आहेत. याचा त्यांनाही निश्चितच आनंद झाला असेल.” याप्रसंगी ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त, ज्येष्ठ गायिका वैशाली सामंत, दिव्या खोसला कुमार, कांचन घाणेकर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होते.

## मीसुद्धा सुशांतसारखं पाऊल उचलणार होतो

चार वर्षं उलटून गेली तरी अजूनही सुशांत सिंह राजपूतच्या मृत्यूबद्दल चर्चा होताना दिसत आहे. त्याचे चाहते अजूनही या धक्क्यातून पूर्णपणे सावरलेले नाहीत. सुशांतच्या मृत्यूमागचं गूढ हे अजूनही कायम आहे. पोलिसांनी जरी त्याची केस बंद केली असली तरी याबद्दल सोशल मीडियावर चर्चा होताना आपल्याला पाहायला मिळते. कोणत्याही गॉडफादरशिवाय केवळ स्वतःच्या मेहनतीवर सुशांतने चित्रपटसृष्टीत स्वतःचं असं वेगळं स्थान निर्माण केलं होतं.सुशांतच्या याच स्ट्रगलबद्दल नुकतंच अभिनेता विवेक ओबेरॉयने भाष्य केलं आहे. इतकंच नव्हे तर सुशांतच्या अंत्यसंस्कारावेळी विवेक स्वतः तिथे उपस्थित होता. त्यावेळी सुशांतच्या वडिलांना पाहून त्याला काय भावना मनात दाटल्या याबद्दल विवेकने खुलासा केला आहे. इतकंच नव्हे तर आपल्या अडचणीच्या काळात आपणही सुशांतसारखं पाऊल उचलणार होतो हेदेखील विवेकने स्पष्ट केलं.

## मेधाने सांगितला प्रवास

विक्रांत मेसी आणि मेधा शंकर अभिनीत ’12TH फेल’ २०२३ चा सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला होता. फक्त २० कोटी बजेट असलेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर तब्बल ६६.५८ कोटींची कमाई केली. ६९ व्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात ’12TH फेल’ चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. हा चित्रपट प्रेक्षकांसह अनेक कलाकारांच्या पसंतीस उतरला आणि त्यांनी भरभरून या चित्रपटाचं कौतुक केलं. या चित्रपटात विक्रांत मेसी याने मनोज शर्मा, तर मेधा शंकरने श्रद्धा जोशी यांची भूमिका साकारली होती.’12TH फेल’ चित्रपट २५० भारतीय चित्रपटांच्या यादीत सामील झाला आहे. अशातच चित्रपटात श्रद्धा जोशी यांची भूमिका साकारणाऱ्या मेधा शंकरला आपल्या संघर्षाच्या दिवसांची आठवण आली. तिने सांगितले की एक काळ असा होता जेव्हा तिच्या बँकेच्या खात्यात फक्त २५७ रुपये शिल्लक होते.अलीकडेच आयएमडीबीला (IMDB) दिलेल्या मुलाखतीत मेधा शंकरने तिच्या संघर्षातील दिवसांची आठवण सांगितली. ती म्हणाली, ’12TH फेल’ चित्रपटाचा भाग होण्यासाठी तिला खूप वेळ लागला. मेधाने २०१८ मध्ये मुंबईत अभिनेत्री म्हणून आपल्या करिअरला सुरुवात केली. २०२२ मध्ये तिने या चित्रपटासाठी कास्टिंग एजन्सीकडे पहिल्यांदा ऑडिशन दिले. नंतर ती दिग्दर्शक विधू विनोद चोप्रा आणि त्यांच्या टीमबरोबर स्क्रीन टेस्टसाठी गेली.ऑडिशनदरम्यान मेधाला हा रोल तिच्यासाठीच आहे अस वाटलं होतं.



## महिलांनी मुलांच्या संगोपनासाठी घरी राहावं

अभिनेत्री काजोल (KAJOL) आणि तिची बहीण तनिषा (TANISHAA) या ज्येष्ठ अभिनेत्री तनुजा (TANUJA) यांच्या मुली आहेत. ज्येष्ठ अभिनेत्री तनुजा यांनी यापूर्वी सांगितले होते की, अभिनय ही त्यांची आवड नव्हती, पण आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना हा मार्ग स्वीकारावा लागला. कुटुंबाच्या आर्थिक अडचणींमुळे त्यांना खूप मेहनत करावी लागली, कारण त्यांना घर आणि संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी उचलावी लागली. ही संघर्षमय परिस्थिती पुढेही सुरू राहिली, तनुजा आणि त्यांचे पती शोमू मुखर्जी यांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतल्यानंतर तनुजांवर त्यांची दोन्ही मुली – काजोल आणि तनिषा यांचे पालनपोषण करण्याची जबाबदारी आली. तनुजा यांच्या मुलींनाही त्यांच्या आईच्या सतत कामानिमित्त घराबाहेर राहण्याची सवय झाली. मात्र, अलीकडील एका मुलाखतीत तनिषाने सांगितले की, माझी इच्छा होती की माझी आई जर काम न करता घरी आमच्याजवळ राहायला हवी होती असे वाटते. तिने हेही म्हटले की, महिलांनी किमान पाच वर्षे आपल्या मुलांवर लक्ष केंद्रित करून नंतरच काम करावे.HAUTTERFLY ला दिलेल्या एका मुलाखतीत तनिषाने सांगितले, “माझी आई आम्ही लहान असताना कामावर जात असे, जर ती कामावर न जाता आमच्याजवळ राहिली असती तर चांगलं झालं असतं. जेव्हा माझा जन्म झाला, तेव्हा आमच्याकडे पुरेसं आर्थिक स्थैर्य नव्हतं, त्यामुळे आईला काम करावं लागलं. ती दिवसाला दोन ते तीन शिफ्टमध्ये काम करत असे. त्यामुळे मला आईला भेटण्याची संधीच मिळत नसे. यामुळे मी तिच्या खोलीत झोपत असे, कारण त्यामुळे मला तिच्या जवळ असल्यासारखं वाटायचं.”

## माधुरीचा ‘हम आपके है कौन’चा खास लूक

बॉलीवूडमधील धक धक गर्ल माधुरी दीक्षित आजही तिच्या अभिनयासह नृत्य कौशल्यामुळे चर्चेत आहे. १९९४ रोजी प्रदर्शित झालेला ‘हम आपके है कौन’ या चित्रपटातील माधुरी दीक्षित आणि सलमान खानची जोडी लोकप्रिय ठरली होती. यात अभिनेत्री विविध प्रकारच्या मॉडर्न आणि एथिनिक लूकमध्ये दिसली होती. या चित्रपटातील गाणी आणि कथानकामुळे चित्रपट हिट झाला होता.मोठ्या कुटुंबासह मित्रपरिवारासमवेत होणाऱ्या भव्य लग्नसोहळ्याचा ट्रेंड त्याकाळी चित्रपटामुळे घराघरांत पोहोचला. चित्रपटात हिंदी सिनेसृष्टीतल्या दिग्गज कलाकारांसह मराठमोळे कलाकारही होते. रेणुका शहाणे, अनुपम खेर, रिमा लागू, अलोक नाथ, लक्ष्मीकांत बेर्डे, प्रिया बेर्डे अशी स्टारकास्ट या चित्रपटाला लाभली होती.‘हम आपके है कौन’ चित्रपटातील ‘दीदी तेरा देवर दीवाना’ हे गाणं तेव्हा खूप प्रसिद्ध झालं होतं. या गाण्यामधील माधुरी दीक्षितच्या जांभळ्या रंगाच्या साडीने आणि बॅकलेस ब्लाउजने प्रेक्षकांचं लक्ष वेधलं होतं. प्रसिद्ध डिझायनर अण्णा सिंग यांनी त्यावेळी ही साडी डिझाइन केली होती. चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या वेळी तब्बल ₹१.५ दशलक्ष किंमतीची ही साडी केवळ फॅशन स्टेटमेंटच नव्हती, तर तिच्या अनोख्या बॅकलेस ब्लाउज आणि फूल स्लीव्हजसह त्याकाळी चर्चेचा विषय ठरली.तीस वर्षांनंतर पुन्हा एकदा माधुरीने ‘दीदी तेरा देवर दीवाना’ या गाण्यातील जांभळ्या साडीमधला लूक रिक्रिएट केला आहे. या लूकचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. ‘डान्स दिवाने’च्या रिॲलिटी शोसाठी माधुरीने या आउटफिटची निवड केली आहे.



आशिया कप 2025

## मैदानातही ऑपरेशन सिंदूर यशस्वी

# भारताचा पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राइक!

## सूर्यादादाचा षटकार अन् भारताचा पाकिस्तानवर दणदणीत विजय

| दुबई |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राइक केला. क्रिकेटच्या मैदानात झालेल्या या ऑपरेशन सिंदूरच्या पुढच्या भागामध्येही भारत यशस्वी ठरला. भारताने जगासमोर पुन्हा एकदा पाकिस्तानच्या मुसक्या आवळल्या आणि मैदान कोणतेही असो, सरस कोण आहे हे सर्वांना दाखवून दिले. पहिल्या चेंडूपासून भारताने पाकिस्तानवर अंकुश ठेवला आणि त्यामुळेच भारताला पाकिस्तानला सर्वांसमोर धुळ चारता आली. भारताने अचूक गोलंदाजी करताना पाकिस्तानला १२७ या माफक धावसंख्येवर रोखले आणि त्यानंतर धडाकेबाज फलंदाजी करत त्यांचा फडशा पाडला. भारताने या सामन्यात पाकिस्तानवर सात विकेट्स राखून दमदार विजय साकारला. तिलक वर्मा आणि अभिषेक शर्मा यांनी या सामन्यात प्रत्येकी ३१ धावा केल्या.**




पहिल्याच चेंडूवर हार्दिक पंड्याने पाकिस्तानला धक्का दिला. पाकिस्तानच्या सैम आयुबला यावेळी भोपळाही फोडता आला नाही. त्यानंतर लगेच जसप्रीत बुमराहने आपले अस्त्र बाहेर काढले आणि पाकिस्तानला दुसरा धक्का दिला. सूर्याने त्यानंतर भारताच्या फिरकीपटूंना मैदानात आणले. यावेळी कुलदीप यादव आणि अक्षर पटेल यांनी पाकिस्तानच्या संघाला आपल्यापुढे लोटांगण घालण्यास भाग पाडले. कुलदीप यादवने यावेळी सर्वाधिक तीन, तर जसप्रीत बुमराह आणि अक्षर पटेल यांनी दोन विकेट्स घेत पाकिस्तानचे जगासमोर पानीपत केले. पाकिस्तानकडून फक्त शाहिबजादा फरहानला चांगली फलंदाजी करता आली. फरहान हा बुमराहला षटकार मारणारा पहिलाच पाकिस्तानचा खेळाडू ठरला. फरहानने यावेळी एक चौकार आणि तीन षटकारांच्या जोरावर ४० धावा केल्या.

पाकिस्तानच्या १२८ धावांचा पाठलाग करताना अभिषेक शर्माने भारताला धमाकेदार सुरुवात करुन दिली. शुभमन गिलही त्याच्या साथीला येत होता खरा, पण तो लवकर बाद झाला. गिलला यावेळी १० धावांवर समाधान मानावे लागले. पण अभिषेक शर्माने धडाकेबाज फलंदाजी सुरुच ठेवली. अभिषेकने यावेळी १३ चेंडूंत ४ चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ३१ धावांची दमदार खेळी साकारली आणि भारताला चांगली सुरुवात करून दिली. अभिषेक शर्मा बाद झाल्यावर सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा यांनी सातत्याने धावा जमवल्या आणि भारताचा विजय सुकर केला. तिलक वर्मा बाद झाल्यावर सूर्या आणि शिवम दुबे या जोडीने भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.भारताने यावेळी पाकिस्तानला या सामन्यात आपल्यापुढे धुळ चारल्याचे पाहायला मिळाले. पहिल्या चेंडूपासून भारताने पाकिस्तानला जे धक्के दिले, ते शेवटपर्यंत त्यांनी कायम ठेवले आणि सामना जिंकला. भारतासाठी हा विजय सर्वात महत्वाचा असेल.

### भारताने पाकिस्तानचा माज कसा उतरवला

भारताने सामना संपल्यावरही पाकिस्तानचा माज उतरवला आणि भारताचा नाद करायचा नाही, हे दाखवून दिले. सामना सुरु होण्यापूर्वी सूर्यकुमार यादवने पाकिस्तानच्या कर्णधारासमोर निषेध केला होता. पण सामना संपल्यावर भारतीय संघाने नेमकं केलं तरी काय, हे आता समोर आलं आहे.

**सूर्याने पाकिस्तानच्या कर्णधारासमोर कसा केला निषेध..**

भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने आशिया कप टी-२० क्रिकेट स्पर्धेतील पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यापूर्वी प्रतिस्पर्धा संघाचा कर्णधार सलमान आगा याच्यासह हस्तांदोलन टाळले. एवढेच नव्हे तर दोघांनी एकमेकांकडेही बघण्यास नकार दिला. प्रतिस्पर्धी कर्णधार नाणेफेकीसाठी उभे राहिले, त्यावेळी सूर्या समालोचक रवी शास्त्री यांच्या नजिक होता. नाणेफेकीच्यावेळी नाणे सूर्याने ऊडवले. नाणेफेक पाकचा कर्णधार सलमानने जिंकली. तो समालोचक रवी शास्त्री यांच्याकडे येत असताना सूर्याने त्याच्याकडे बघणे टाळले तसेच सलमानसह हस्तांदोलनाची तयारीही न दाखवता तो बाजूला निघून गेला.

भारतीय खेळाडूंनी सामना संपल्यावर कोणत्याही प्रकारे पाकिस्तान खेळाडूंशी नजरानजर टाळली. एवढेच नव्हे तर सामना संपल्यानंतर प्रतिस्पर्धी संघांकडून एकमेकांचे चांगल्या खेळाबद्दलचे कौतुकही टाळले. सूर्यकुमार आणि शिवम दुबे सामना संपल्यानंतर थेट ड्रेसिंग रुममध्ये परतले. भारतीय संघाच्या ड्रेसिंग रुमच्या बाहेर पाकिस्तानचे खेळाडू आले होते. पण भारताचे खेळाडू त्यांच्यासाठी बाहेरच आले नाही. पाकिस्तानच्या खेळाडूंनी भारतीय खेळाडूंना मैदानाबाहेर बोलावण्याचा प्रयत्न केला. पण एकही भारतीय खेळाडू याला बळी पडला नाही.

# हार्दिक-बुमराह जोडीची कमाल

## कुलदीपची फिरकी, सूर्यकुमारची बॅट तळपली

| दुबई |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**टीम इंडिया विरुद्ध पाकिस्तान यांच्यातील हायव्होल्टेज आणि बहुप्रतिक्षित सामना आज दुबईच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात नाणेफेक जिंकत पाकिस्तानने फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण हाच निर्णय पाकिस्तानच्या अंगलटी पडला. कारण भारतीय गोलंदाजांच्या माऱ्यापुढे पाकिस्तानी फलंदाज अपयशी ठरत गेले. केवळ दोन फलंदाजांमुळे पाकिस्तानचा स्कोर हा 100 च्या पार जाऊ शकला. टीम इंडियाकडून सर्वच गोलंदाजांनी जबरदस्त परफॉर्मन्स दाखवला..**




यामध्ये कुलदीप यादवने सर्वाधिक 3 विकेट घेतल्या. भारतीय गोलंदाजांच्या आव्हानांना तोंड देताना पाकिस्तानच्या फलंदाजांची चांगलीच ससेहोलपट झाली. तरीही शाहीन शाह आफ्रिदीची शेवटच्या षटकांतील बेधडक फलंदाजी महत्त्वाची ठरली. पाकिस्तान संघाने 20 षटकांत 9 बाद 127 धावा केल्या. तर पाकिस्तानचं 128 धावांचं आव्हान भारतीय संघाने 7 गडी राखत सहज पूर्ण केलं.

**पहिल्याच चेंडूत पाकिस्तानची विकेट**

पाकिस्तानच्या सलामीवीर सैम अयुब याला भारतीय गोलंदाज हार्दिक पांड्या याने पहिल्या षटकाच्या पहिल्यात बॉलवर झेलबाद केलं. यानंतर पाकिस्तानचा संघ सावरण्याचा प्रयत्न करत असतानाच दुसऱ्याच षटकात जसप्रीत बुमराहने दुसरा मोठा झटका दिला. कारण पाकिस्तानचा तिसऱ्या नंबरचा फलंदाज मोहम्मद हरीस हा झेलबाद झाला. हार्दिक पांड्याने त्याचा झेल टिपला. हरीस याच्या विकेटमुळे अवघ्या 6 धावांवर 2 विकेट अशी अवस्था पाकिस्तानची झाली. पाकिस्तानच्या संघावर यामुळे मोठा दबाव निर्माण झाला होता.

### पाकिस्तानने सावरण्याचा प्रयत्न केला पण...

यानंतर पाकिस्तानच्या संघाने सावरण्याचा प्रयत्न केला. फखर जमान आणि साहिबजादा फरहान ही जोडी कुठेतरी स्थिर होत असतानाच आठव्या षटकात पाकिस्तानच्या संघाला तिसरा मोठा झटका बसला. कारण अक्षरने टाकलेल्या चेंडूवर फखर जमान झेलबाद झाला. तिलक वर्माने त्याचा झेल अचूक टिपला. यानंतर पाकिस्तानचा कर्णधार सलमान आगा हा दहाव्या षटकात स्वस्तात तंबूत परतला. त्याला 12 चेंडूंवर केवळ 3 धावा करता आल्या.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज

ePaper

। सोमवार ।

। दि. 15 सप्टेंबर 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

। सोमवार ।

। दि. 15 सप्टेंबर 2025।

# उत्सवाच्या माध्यमातून नव्या पिढीत एकजुट आणि सामाजिक बांधिलकीची भावना-सुलभा उबाळे

## गौरी गणपती सजावट स्पर्धा बक्षिस वितरण; महिला भगिनींचा उदंड प्रतिसाद

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**भारतीय संस्कृती, सण, समारंभ यांना ऐतिहासिक परंपरा आहे. गणेश उत्सवाच्या माध्यमातून तर स्वातंत्र्याचा लढा उभारला गेला. नागरिकांमध्ये जागृती करण्याचे काम या उत्सवांनी केलेले आहे. नव्या पिढीत एकजूट आणि सामाजिक बांधिलकीची भावना या उत्सवातूनच निर्माण होते. असे मत शिवसेना उपनेत्या**



शिवसेना उपनेत्या सुलभा उबाळे आणि युवा सेना पुणे जिल्हा प्रमुख अजिंक्य उबाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना शाखा प्रभाग 13 यमुनानगर आयोजित गौरी गणपती सजावट स्पर्धा 2025 चे बक्षीस वितरण मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी सुलभा उबाळे बोलत होत्या.

या कार्यक्रमास भोसरी विधानसभा महिला संघटिका शशिकला उभे, शिवसेना नेते अंकुश जगदाळे, तसेच गणेश इंगवले, जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष नारायण पाटील गजानन ढमाले, भगवान श्राध्ये, विजय मोगरे, अरुण बांद्रे नयना पारखे, भारती चकवे, संगीता टुपके, ममता कदम, युवा सेनेचे अनिकेत येरुणकर, प्रिया जपे, किरण वाडकर, कावेरी परदेशी, आप्पा काळोखे, कौस्तुभ गोळे, सार्थक दोषी, युवा सेना उपजिल्हाप्रमुख अमित शिंदे आदी उपस्थित होते

या प्रसंगी बोलताना सुलभा उबाळे यांनी सांगितले की अशा उपक्रमांमुळे आपली पारंपरिक संस्कृती जपली जाते. तसेच नव्या पिढीत एकजूट आणि सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण होते म्हणूनच अशा स्पर्धा वेळोवेळी आयोजित होणे गरजेचे आहे

कार्यक्रमास प्रभागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र आणि आकर्षक पारितोषिक देऊन गौरवण्यात आले.सर्व सहभागी स्पर्धकांना भेटवस्तू देण्यात आल्या.

# संत साई हायस्कूलमध्ये उत्साहात झाला आनंदोत्सव

## ‘आजी-आजोबा दिन’! : आधुनिक पालकत्व आणि आजी-आजोबांची भूमिका मार्गदर्शन

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**संत साई हायस्कूल, आदिनाथ नगर येथे आज अतिशय उत्साही आणि आनंदमय वातावरणात ‘आजी-आजोबा दिन’ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचा उद्देश आजी-आजोबांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, त्यांच्या अनुभवसंपन्न जीवनातून मूल्यशिक्षण घेणे, तसेच मुलांना त्यांच्या आजी-आजोबांशी अधिक प्रेमळ नातं जोडण्यासाठी प्रेरित करणे हा होता.**



कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने आजी-आजोबांच्या स्वागताने झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थापक श्री. शिवलिंग ढवळेश्वर सर यांनी आपल्या प्रभावी भाषणातून जीवन, शिक्षण आणि मंदिर या तीन संकल्पनांचा अर्थ समजावून सांगितला. तसेच आधुनिक पालकत्व, विद्यार्थ्यांची जबाबदारी आणि आजी-आजोबांची भूमिका यावर मार्गदर्शन केले.

शाळेतील शिक्षकांनी आजी-आजोबांसाठी विविध रंजक खेळांचे आयोजन केले. या खेळांमध्ये आजी-आजोबांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि विजेत्यांना बक्षिसेही देण्यात आली. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान दृश्यतः अनुभवता आला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी सेल्फी पॉईंटवर जाऊन आपल्या नातवंडांसोबत छायाचित्रे काढली. अनेकांनी आपली कृतज्ञता व्यक्त करत शाळेच्या उपक्रमाचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे उत्तम नियोजन शाळेच्या संचालिका सौ. सुनीता ढवळेश्वर मॅडम, विश्वस्त सौ. पायल ढवळेश्वर, उपमुख्याध्यापिका सौ. रुपाली खोल्लम, सौ. भारती ढवळेश्वर, सौ. संगीता पाटील, सौ. आरती मुट्टगीशेत्तर तसेच शिक्षकवृंदातील सौ. स्वाती मोघे, सौ. सुवर्णा तुकोळ, सौ. पवित्रा सारकी, सौ. शितल गवांदे, श्री. संजय अनार्थे व श्री. मनोज वाबळे सर यांच्या अथक प्रयत्नांमुळे शक्य झाले. प्रास्ताविक सौ. सुनिता चौहान मॅडम यांनी केले.

## गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलचा

# जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत डंका!

## शिक्षण विश्व: 17 सुवर्ण, 8 रौप्य व 1 कांस्य पदकांची कमाई

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये 'सेल्स डे' मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्यांचा विकास व्हावा, उद्योजकतेची गोडी लागावी आणि सर्जनशीलता वाढीस लागावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**




पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग (भारोत्तोलन) स्पर्धेत गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या दमदार कामगिरीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. अण्णासाहेब डांगे जलतरण तलाव, नेहरूनगर येथे पार पडलेल्या या स्पर्धेत गायत्री स्कूलच्या विद्यार्थ्यांनी एकूण १७ सुवर्ण, ८ रौप्य आणि १ कांस्य पदक जिंकत दिमाखदार यश संपादन केले.

**गायत्री चे सुवर्णपदक विजेते खेळाडू (GOLD MEDALISTS):**

वयोगट १९: भक्ती ठोंबरे, प्रगती कड, विराज विशे, साहिल ठाकरे, हर्षद शिंदे, सूरज सिंग, सुशील मांझी, हर्षद चौधरी, मोहित संगनी

वयोगट १७: आयुष सिंग, कुशल चौधरी, तसलिम अन्सारी, ऋतुराज आंब्रे, पल्लवी चव्हाण

**रौप्य पदक विजेते (SILVER MEDALISTS):**

वयोगट १९: सौमित्र कुलकर्णी, रुद्रा गायकवाड, चैतन्य आढे, सागर सिंग

वयोगट १७: अंशिका भारती, अनामिका विश्वकर्मा, विघ्नेश सावरातकर, राजवीर सस्ते

**कांस्य पदक विजेता (BRONZE MEDALIST):**

वयोगट १७: रूद्र पवार

भारोत्तोलन या खेळामध्ये दोन्ही टोकांना वजनदार चकत्या असलेली लोखंडी काठी (बारबेल) डोक्याच्या वर उचलण्याची क्षमता ही मुख्य कसोटी असते. सर्वात जास्त वजन उचलणारा खेळाडू विजेता ठरतो. या कठीण आणि कौशल्यपूर्ण खेळात गायत्री स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सिद्ध केले की शारीरिक ताकदाबरोबरच मानसिक तयारी आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन हेदेखील तितकेच महत्त्वाचे असते.

या उल्लेखनीय यशानंतर संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. विनायक भोंगाळे साहेब यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन केले आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

याचप्रमाणे संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालिका माननीय सौ. कविताताई कडू पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अंजली भागवत, विपणन अधिकारी मा. श्री शैलेंद्र सिंग, मुख्याध्यापक मा. श्री ज्योतिबा सुरवसे, तसेच सर्व उपमुख्याध्यापक, पालकवर्ग आणि शिक्षकवृंद यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षक श्री. समाधान माने, श्री. रविंद्र कालवई व सौ. अश्विनी कागळे यांचे विशेष कौतुक केले. गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलने शालेय स्तरावर उत्तम प्रशिक्षण व योग्य मार्गदर्शनामुळे खेळाडू घडविण्याचे जे कार्य केले आहे, त्याचे समाजातही सकारात्मक पडसाद उमटत आहेत. या यशाने भविष्यातील राज्य व राष्ट्रीय स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना अधिक आत्मविश्वास मिळेल, असे मत क्रीडा क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केले आहे.

---

## "महाराष्ट्र उभारणीत एस. बी. पाटील यांचे योगदान – भावे"

## शिक्षण विश्व: पीसीईटीमध्ये स्मृतिदिनानिमित्त एस. बी. पाटील यांना अभिवादन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर राज्याच्या कृषी, औद्योगिक विकासावर भर देण्यात आला. तो काळ १९६० चा होता. यशवंतराव चव्हाण, आचार्य अत्रे, केशवराव जेधे यांच्या दूरदृष्टी नेतृत्वासोबत शंकरराव बाजीराव पाटील ऊर्फ भाऊ यांनी जबाबदारीने कार्य केले. भाऊंनी रोजगार हमी योजनेतील कामगारांना वेतन आणि धान्य देण्याचा निर्णय, कामगारांना किमान वेतन मिळाले पाहिजे, शेतकऱ्यांनी कष्टाने पिकविलेल्या धान्याला योग्य दाम मिळावे यासाठी राज्याला नव्हे तर संपूर्ण देशाला दिशा देणारे कायदे विधीमंडळात संमत करून घेतले. भाऊंच्या कार्याची चुणूक महाराष्ट्राला पहायला मिळाली. भाऊंनी सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेतले. याचे अनुकरण आजच्या पिढीने केले पाहिजे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे मत ज्येष्ठ पत्रकार, संपादक मधूकर भावे यांनी व्यक्त केले.**



### "श्रीमंतीची वाटणी म्हणजे समाजवाद"

मुठभर व्यक्तींच्या हातात पैसा आणि सत्ता असणं योग्य नाही. सत्तेच्या माध्यमातून गोरगरीब जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. श्रीमंतीची गोरगरिबांमध्ये वाटणी झाली पाहिजे. हा खरा समाजवाद आहे, असे भाऊंचे ठाम मत होते, असे मधूकर भावे यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे (पीसीईटी) संस्थापक अध्यक्ष स्व. शंकरराव बाजीराव पाटील यांच्या १९ व्या स्मृतिदिनानिमित्त शनिवारी (१३ सप्टेंबर) पीसीईटीच्या निगडी येथील सभागृहात मधूकर भावे यांचे "भाऊंचे महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी पीसीईटीच्या उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पिंपरी चिंचवड विद्यापीठ पीसीयु अभ्यास मंडळाचे सदस्य सचिन इटकर उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड शहर आणि परिसरातील सर्वसामान्य जनतेच्या मुलांना दर्जेदार उच्च शिक्षण मिळावे, या उद्देशाने भाऊंच्या नेतृत्वाखाली पीसीईटी एज्युकेशन ट्रस्टची स्थापना करण्यात आली. छोट्याशा रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले, हे पाहून आनंद वाटतो, असे विठ्ठल काळभोर यांनी प्रास्ताविकात सांगितले.

भाऊंचा १९६१ ते १९७८ हा विधानसभेतील काळ मला जवळून पाहता आला. ते सहा वेळा आमदार झाले. १९५७ मध्ये पश्चिम महाराष्ट्रात कॉंग्रेसची धुळधाण उडाली मात्र भाऊ पाच हजारांच्या मताधिक्याने विजयी झाले, अशी आठवण भावे यांनी सांगितली.

## Dr. D. Y. PATIL COLLEGE OF AGRICULTURE BUSINESS MANAGEMENT, AKURDI, PUNE

Institute Code: 18197



# TRAINING & PLACEMENT CELL ORGANIZED

## STUDENTS INTERACTION SESSION UNDER

Industry and Academic Integration for
Industry's Demands & High Employability

## IN COLLABORATION WITH

## KHET PE - SWAN ENERGY LTD.



**Date: 3rd Sep 2025**
**Time: 11.00am to 12.30pm**
**Venue: MCA Seminar Hall**

www.dypagribusiness.ac.in | info.dypagribusiness.ac.in | @dypabmakaurdi | @dypcabm | @dypabm


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046